**प्रेस नोट दि. ०७/०४/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

**नागपुर येथील मिसिंग मनोरूग्ण मुलगी तिचे आईचे ताब्यात दिलेबाबत...**

दिनांक ०४/०४/२०१९ रोजी सायं.१७.०० वा.चे सुमारास दत्तात्रय अनंत गायकवाड,रा.बिल्डींग नं.६/३१,गोपीनाथनगर,कोथरूड,पुणे. यांना एक मनोरूग्ण मुलगी ही मुलगी वारजे ब्रिज जवळ मिळुन आल्याने त्यांनी सदर मुलीस शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे हजर केल्यानंतर,त्या मुलीकडे पोलीस उप निरीक्षक,दर्शन शिंदे, महिला पोलीस हवालदार,मंगल बांडागळे यांनी चौकशी केली असता,मनोरूग्ण मुलगी,वय-२४ वर्षे,रा.अजनी नागपुर असे सांगितलेने पोलीस उप निरीक्षक,दर्शन शिंदे यांनी त्याबाबत बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे यांना माहीती दिली. त्यांनी नंबर घेवुन,मुलीला धीर देवुन नातेवाईकांबाबत विचारणा केली असता,सदर मुलीने तिची आई हिचा मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता, तीने मुलगी ही मनोरूग्ण असुन ती दिनांक ०२/०४/२०१९ रोजी घरातुन निघुन गेलेली आहे. त्याबाबत अजनी पोलीस ठाणे नागपुर शहर येथे मिसिंग तक्रार नोंद करण्यात आलेली असल्याचे सांगितले. व सदर मुलीला घेवुन जाण्यासाठी दिनांक ०५/०४/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत येत असल्याचे कळविले.

पोलीस उप निरीक्षक,दर्शन शिंदे यांनी मिळुन आलेली मुलगी हिचे बाबत अजनी पोलीस ठाणे येथे मिसिंग तक्रार दाखल आहे अगर कसे याबाबत खात्री करण्याकरीता अजनी पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. गोंजार यांचेशी त्यांचा मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी नमुद मुलीबाबत मनुष्य मिसिंग नं. ३२/२०१९ अन्वये मिसिंग तक्रार दि. ०३/०४/२०१९ रोजी दाखल असल्याचे सांगितले. व मुलगी कुमारी ममता हिस तिची आई हिचे ताब्यात देण्यास सांगितले.

दिनांक ०५/०४/२०१९ रोजी कुमारी ममता हिची आई या पोलीस ठाणे येथे हजर झाल्याने त्यांचा जबाब नोंद करून मुलगी हिस तिचे आईचे ताब्यात देवुन नमुद मुलीला अजनी पोलीस ठाणे येथे घेवुन जाणेबाबत सांगितले. तसेच त्याबाबत दाखल मनुष्य मिसिंगचे तपासी अंमलदार पो.हवा.पांडे यांना कळविण्यात आलेले आहे.

वरील नमुद कामगिरी ही श्री.बाळासाहेब कोपनर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,शिवाजीनगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि रणजीत भोईटे, पो.उ.निरी. दर्शन शिंदे, म.पो.हवा.मंगल बांडागळे, यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर